रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर
# जि.अहमदनगर
# आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियान शिबीर
# दि ९ व १० फेब्रुवारी अहवाल सन २०१७

दि. ११/०२/२०१७

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यार्थी कल्याण मंडळाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ९ व १० फेब्रुवारी २०१७ रोजी 'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियान' शिबीर संपन्न झाले. सदर शिबीराचे उद्‌घाटन सकाळी ९.३०वाजता संपन्न झाले. या उद्‌घाटनाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ हवामान अंदाज व शाश्वत शेती तज्ञ मान. प्रा.बी.एन.शिंदे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षा रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्या, रयत शैक्षणिक संकुल श्रीरामपूरच्या चेअरमन मा.सौ.मीनाताई जगधने व मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.एस.एन.गवळी,विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी प्रा.डॉ.तुपे बी.जी. सर्व प्राध्यापक वृंद विद्यार्थी-विद्यार्थिनी सदर कार्यक्रमास उपस्थित होते.

## उद्‌घाटन समारंभ (स. ९.३० ते १०.३०)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यार्थी कल्याण मंडळाच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या उद्‌घाटन समारंभाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.बी.जी.तुपे यांनी केले. त्यांनी प्रास्ताविकामध्ये अकस्मात येणाऱ्या आपत्तींना तोंड देण्यासाठी, आपत्ती विषयक जुजबी ज्ञान असणे तसेच आपत्ती पुर्वी घ्यावयाची खबरदारी, आपत्ती दरम्यान द्यावयाची काळजी आणि आपत्ती नंतर घ्यावयाची काळजी ह्या बदद्ल आवश्यक ती माहिती असणे किंवा जाणून घेणे कधीही हितावट असते जेणे करुण संभावणारी जीवित हानी असणे किंवा जाणून घेणे कधीही हितावह असते जेणे करुण संभवणारी जीवित व वित्त हानी अगदी संपूर्णत: जरी टाळता आली नाही तरी काही अंशी का होईना आपण त्याचे प्रमाण कमी करु शकतो. या जिवीत व वित्तीय हानीपासून संरक्षण करण्यासाठी काही उपाययोजना सुचविणे व विद्यार्थ्यांमध्ये आपत्तीविषयी जागृतता निर्माण करण्यासाठी असे शिबिर महाविद्यालयात घेतले जातात असे नमूद केले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्या, रयत शैक्षणिक संकुल श्रीरामपूरच्या अध्यक्षा, मा.सौ.मीनाताई जगधने यांनी केले. त्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, आपत्ती काळात तसेच आपत्ती नंतर विशेषत: अल्पवयीन बालके, वृद्ध, महिला तसेच अपंग यांना कमीत कमी त्रास होईल याची दक्षता बाळगणे अत्यंत गरजेचे असते. याशिवाय आपत्ती काळात पाणीपुरवठा, खाण्यापीण्याची व्यवस्था, वैद्यकीय सेवा, औषध सामग्री,

सांडपाण्याची व्यवस्था तसेच जनावरांना चारा इत्यादी सुरळीत चालतील याकरीता स्थानिक पातळीवर आपत्ती व्यवस्थापन करणे गरजेचे असते. त्यासाठी तितक्याच उत्स्फूर्तपणे लोकसहभाग मिळणे आवश्यक असते. जो आपल्याला जनजागृतीद्वारे साध्य करता येवू शकतो. म्हणूनच महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये याविषयी जनजागृती होण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियान शिबिराचे आयोजन करणे गरजेचे वाटते.

मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर यांनी आपल्या भाषणात महाविद्यालयामध्ये अनेक प्रकाराच्या नैसर्गिक व कृत्रीम आपत्ती येवू शकतात. त्यामध्ये भूकंप, अतिवृष्टी, दुष्काळ, दंगल, दरोडा, चोरी, चेंगराचेंगरी अशा आपत्ती येवू शकतात. महाविद्यालयात इमारत ढासाळणे शॉर्ट सर्किट होणे, गॅस गळती होणे, आग लागणे, विद्यार्थी-विद्यार्थिनींना चक्कर येणे, रॅगिंग होणे, भांडणे होणे, प्रशासकीय ताणतणाव निर्माण होणे अशा अनेक आपत्ती येवून महाविद्यालयात समस्या निर्माण होऊ शकतात. या समस्यांवर उपाययोजना म्हणून आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियान शिबिर आयोजित करुन उपाययोजना सुचविणे आवश्यक असते असे नमूद केले. उद्‌घाटन समारंभाचे आभार प्रा.डॉ.सौ.गुजर पी.एस. यांनी मानले.

## प्रथम सत्र (स. १०.३० ते ०१.००)

आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियान शिबिराच्या प्रथम सत्राचे प्रास्ताविक प्रा.कुलकर्णी एस.व्ही. यांनी केले. त्यांनी जागतीक हवामान बदलाचे शेतीवर होणारे परिणाम या विषयाच्या प्रास्ताविकामध्ये नैसर्गिक आपत्तीविषयी माहिती सांगितली त्यामध्ये पूर, भुकंप, दुष्काळ या विषयी माहिती सांगितली. त्यांनी महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांपासून सतत दुष्काळ पडत आहे. या दुष्काळाची मोठी झळ शेतकऱ्यांना बसत आहे. शेतीमाल पाण्याशिवाय येवू शकत नाही. पिण्याच्या पाण्याची टंचाई, जनावरांच्या चाऱ्याची टंचाई शेतकरी आत्महत्या करीत आहे असे नमूद केले.

प्रमुख वक्ते ज्येष्ठ हवामान अंदाज व शाश्वत शेती तज्ञ मा.प्रा.बी.एन.शिंदे यांनी जागतीक हवामान बदलाचा शेतीवर होणारा परिणाम याविषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मनोगतात नैसर्गिक आपत्तीमध्ये दुष्काळ पडल्यानंतर सर्व क्षेत्रांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. यामध्ये कृषी क्षेत्राची सर्वात मोठी हाणी होते, कृषी क्षेत्र पाण्यावर अवलंबून असते. जर पिकांना पाणी नसेल, हवामान अनुकूल नसेल तर पिके चांगली येणार नाही. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होईल. मराठवाडा, विदर्भ याठिकाणी दुष्काळाचा परिणाम मोठ्या प्रमाणात जाणवतो दुष्काळामुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहे आणि आजही करीत आहे. यावर उपाय म्हणून जागतिक हवामान बदलाची कारणे व उपाययोजना शोधून जनजागृतीद्वारे हवामानानुसार, पाण्यानुसार शेतीचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे असे नमूद केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.खराडकर यु.एन. यांनी केले.

भोजन (दु. १.०० ते ३.००)

## द्वितीय सत्र (दु ३.०० ते ४.००)

द्वितीय सत्राचे प्रमुख वक्ते मा.ससाने एस.बी. यांनी नैसर्गिक आपत्ती आणि व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मनोगतात भुकंप, पूर, दुष्काळ, चक्रीवादळ या नैसर्गिक आपत्तीचे प्रतिबंध आणि नियंत्रण कसे करावे याबददल प्रात्यक्षिक देवून सविस्तर मार्गदर्शन केले. भुकंप आल्यावर काय करावे, काय करु नये, तसेच सर्व सजीवांची कळजी प्रथम घ्यावी व नंतर आर्थिक, निर्जिव वस्तूंची काळजी घ्यावी असे नमूद केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.कुलकर्णी एस.व्ही. यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.लांडे आर.डी. यांनी केले.

## तृतीय सत्र दि. १०/०२/२०१७ (स. ११.०० ते १.००)

तृतीय सत्राचे प्रमुख वक्ते माजी.वायुसेना अधिकारी, सेफ्टी ऑफिसर मा.श्री.सुनिल बी.देशमुख यांनी आग नियंत्रण आणि प्रतिबंध या विषयावर विद्यार्थ्यांना आग नियंत्रणासंबंधी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आगेच्या प्रकारानुसार वेगवेगळी उपाययोजना कशी करावी याचे प्रात्यक्षिक दिले. तसेच फायर एक्सटिंग्वीशर कसे वापरावे या विषयीदेखील प्रशिक्षण दिले. त्यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयात आग प्रतिबंधक उपाययोजनेसाठी कशा प्रकारची यंत्रणा असावी या विषयीदेखील सविस्तरपणे मार्गदर्शन केले. आग ही प्रामुख्याने तीन घटकांमुळे निर्माण होते ती म्हणजे ज्वलनशील पदार्थ + ऑक्सिजन + पुरेशी उष्णता. या तीनपैकी एक घटक जरी आगीपासून दूर केला तर आग त्वरीत नियंत्रणात येवू शकते. या बददल तीन वेगवेगळी आग नियंत्रणाची प्रात्यक्षिके दाखवून त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.कुलकर्णी एस.व्ही यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.तुपे बी.जी. यांनी केले.

## चतुर्थ सत्र (दु ३.०० ते ४.००)

चतुर्थ सत्रासाठी मे.सुधिर गोविंद जोशी भारत गॅस वितरक, श्रीरामपूर येथिल व्यवस्थापक श्री.अभिजित काळे, अधिकारी श्री.अशोक शिंदे, श्री.विजय माने, श्री.संदिप पन्हाळे आदि उपस्थित होते. या सत्रासाठी लाभलेले प्रमुख वक्ते मा.श्री.अशोक शिंदे यांनी घरगुती गॅस वापर करतांना निर्माण होणाऱ्या आपत्तीचे प्रतिबंध आणि नियंत्रण कसे करावे या विषयावर विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. त्यामध्ये त्यांनी ग्राहकाने गॅस सिलेंडर ताब्यात घेताना कोणकोणत्या गोष्टी तपासाव्यात गॅस लिक झाल्यावर किंवा गॅसचा वास येत असल्यास काय करावे आणि काय करु नये या बददल मार्गदर्शन केले. तसेच गॅस वाचविण्याचे उपाय कोणते आहेत, गॅस सिलेंडरने पेट घेतल्यास तो कसा विझवावा, स्फोट होण्यापासून कसा वाचवावा या बददल प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करुन विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. तसेच घरगुती गॅसचा वापर करतांना काही आपत्ती निर्माण झाल्यास भारत सरकारने जारी केलेला १९०६ हा आपातकालीन हेल्प लाईन नंबर देखील दिला. तसेच आपण एक आदर्श नागरिक असून

पर्यावरण संरक्षणासाठी स्वच्छ इंधनाचा वापर या संदर्भी जनजागृती करण्यासंबधात प्रमुख वक्त्यांच्या मार्गदर्शनानुसार प्रा.कुलकर्णी एस.व्ही. यांनी विद्यार्थ्यांकडून पर्यावरण संरक्षणासाठी स्वच्छ इंधनाचा वापर करण्यासंबंधी प्रतिज्ञा घेतली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.खराडकर यु.एन. यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.कुलकर्णी एस.व्ही. यांनी केले.

सदर शिबिराच्या यशासाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियान शिबिराचे समन्वयक प्रा.कुलकर्णी एस.व्ही., विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.डॉ.तुपे बी.जी., प्रा.खराडकर यु.एन., प्रा.लांडे आर.डी., प्रा.दुग्गल एस.ए. यांनी विशेष श्रम घेतले तर प्रा.भावसार बी.एस. आणि प्रा.काला पी.आर. यांनी सदर शिबिराचे सूत्रसंचालन केले.

**कार्यक्रम अधिकारी**
**विद्यार्थी कल्याण मंडळ**


**प्राचार्य**
**सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स**
**श्रीरामपूर**

PRINCIPAL
C. D. Jain College of Commerce
Shrirampur



PRINCIPAL
C. D. Jain College of Commerce
Shrirampur

विद्यार्थी कल्याण मंडळ अंतर्गत आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियान विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. शिंदे बी. एन. आणि विद्यार्थी व्याख्यानाचा आनंद घेताना.



PRINCIPAL
C. D. Jain College of Commerce
Shrirampur.

विद्यार्थी कल्याण मंडळ अंतर्गत आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियानात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आलेले मान्यवर प्रा. सरनोबत एस. बी. यांचा सत्कार करताना प्रा. खरडकर यु. एन.




PRINCIPAL
C. D. Jain College of Commerce
Shrirampur.

विद्यार्थी कल्याण मंडळ अंतर्गत आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री देशमुख सुनिल व व्यासपीठावर प्रा. डॉ. नुपे बी. जी. आणि प्रा. कुलकर्णी सर




PRINCIPAL
C. D. Jain College of Commerce
Shrirampur.

आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियान कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री अभिजीत काळे हे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक दाखविताना.

स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद - " कर्मवीर "



रयत शिक्षण संस्थेचे,



चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर,

जि. अहमदनगर - ४१३७०९

नॅक मानांकित "ए" ग्रेड

आय.एस.ओ. ९००१-२००८ मानांकित महाविद्यालय

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यार्थी कल्याण मंडळ

## यांच्या संयुक्त विद्यमाने,

# "आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण अभियान "

गुरूवार, दि. ०९ फेब्रुवारी २०१७ वेळ सकाळी ०९:३० वाजता

## उद्‌घाटन समारंभ

| | | |
|---|---|---|
| प्रास्ताविक व स्वागत | : | प्रा. डॉ.तुपे बी.जी. |
| उद्‌घाटक | : | मा. सौ. मीनाताई जगधने,<br>सदस्या, मॅनेजिंग कौन्सिल, र.शि.सं.सातारा<br>चेअरमन, रयत शैक्षणिक संकुल , श्रीरामपूर |
| प्रमुख पाहुणे | : | मा. प्रा. बी.एन. शिंदे<br>हवामान तज्ञ, अहमदनगर |
| प्रमुख उपस्थिती | : | मा.प्राचार्य डॉ.लक्ष्मणराव भोर<br>(सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर )<br>डॉ. बारहाते जी.एच.<br>(वाणिज्य व संशोधन विभागप्रमुख ) |
| आभार | : | प्रा.डॉ. सौ गुजर पी.एस. |
| सूत्रसंचालन | : | प्रा. भावसार बी.एस.<br>प्रा.कु.काला पी.आर |

PRINCIPAL
C. D. Jain College of Commerce
Shrirampur

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि विदयार्थी कल्याण मंडळ अंतर्गत



रयत शिक्षण संस्थेचे,

## सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर,



यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी कल्याण मंडळ

व विद्यार्थीनी मंच यांच्या समन्वयाने आयोजित

# निर्भया कक्ष व विदयार्थिनी व्यक्तिमत्व विकास शिबीर

## ☙ उद्‌घाटन समारंभ ☙

शनिवार दिनांक ३ सप्टेबर २०१६ वेळ सकाळी १०.३०

## ✷ कार्यक्रम पत्रिका ✷

| | |
|---|---|
| ▲ प्रास्ताविक व स्वागत | : प्रा.सौ.गुजर पी.एस |
| ▲ उदघाटक | : ॲड.रंजनाताई गवांदे<br>(सामाजिक कार्यकर्त्या, महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती) |
| ▲ अध्यक्षा | : मा.सौ.मीनाताई जगधने<br>(मॅनेजिंग कौन्सिल सदस्या, रयत शिक्षण संस्था, सातारा.<br>चेअरमन रयत शैक्षणिक संकूल, श्रीरामपूर) |
| ▲ प्रमुख उपस्थिती | : मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर<br>(सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर)<br>मा.उपप्राचार्य डॉ.बारहाते जी.एच<br>(संशोधन विभाग प्रमुख) |
| ▲ आभार प्रदर्शन | : प्रा.डॉ.तुपे बी.जी |
| ▲ सूत्र संचालन | : प्रा.काला पी.आर.<br>प्रा. सौ.भावसार बी.एस. |

रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,

श्रीरामपूर, जि.अहमदनगर.

## विद्यार्थी कल्याण मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित

# "विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास शिबीर" अहवाल

दि. ०३/०९/२०१६

विद्यार्थी कल्याण मंडळ व विद्यार्थीनी मंच यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थीनी व्यक्तीमत्व शिबीर दि.०३ सप्टेबंर २०१६ रोजी आयोजित करण्यात आले.या शिबीरासाठी महाविद्यालयातील २१५ विद्यार्थीनींनी सहभग नोंदविला. या शिबीराच्या उद्घाटन सोहळ्यास उद्घाटक म्हणून अॅड.रंजनाताई गवांदे (सामाजिक कार्यकर्त्या,महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समिती ) लाभल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान मा.सौ.मीनाताई जगधने, चेअरमन, रयत शैक्षणिक संकुल,श्रीरामपूर,मॅनेजिंग कौन्सिल सदस्य,रयत शिक्षण संस्था,सातारा यांनी भुषविले.महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.एल.डी.भोर व उपप्राचार्य मा.डॉ.जी.एच.बारहाते यांनी शिबीराचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती नोंदविली.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा सौ.पोर्णिमा गुजर यांनी केले.प्रास्ताविकात विद्यार्थीनी व्यक्तीमत्व विकास शिबीराचे उद्येश व पाहुण्यांचा अल्पपरिचय करुन दिला.

✦ **उद्घाटन वेळ** - सकाळी १०.३० वाजता.

विद्यार्थीनी व्यक्तीमत्व विकास शिबीरासाठी उद्घाटक म्हणून लाभलेल्या मा.अॅड. रंजनाताई गवांदे यांनी आपल्या मनोगतामध्ये स्त्रीयांवरील होणा-या अत्याचारामागे व अशा कृत्यांची पुनरावृत्ती होण्यामागे असलेले मुलभूत कारण म्हणजे पुरुषांची स्त्रीयांबद्यल असलेली मानसिकता असून ते बदलन्याची गरज व्यक्त केली.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना सौ.मीनाताई जगधने यांनी महाविद्यालयातील विद्यार्थीनींना निर्भया होण्यासाठी सर्व प्रथम मुलींनी स्वताची ओळख करुन घेऊन श्रध्दा व अंधश्रध्दा यामधील फरक ओळखून ते आचरणात आणणे कसे गरजेचे आहे ते पटवून दिले. आजच्या विद्यार्थीनीने कोणतीही व्रत वैकल्ये करतांना शास्त्रीय दृष्टीकोन अंगीकारावा व वृक्षारोपण हे आपले कर्तव्य आहे, असे समजून या व्रताचा स्विकार करण्याचे सांगितले.जिद्यीचे महत्व पटवून देतांना त्यांनी युसुफ मलाला व दिपा अरुण यांचा चरित्र परिचय करुन दिला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी पदी असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.डी.भोर यांनी उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षा व उद्घाटक यांचे स्वागत व सत्कार केला.महाविद्यालयातील विद्यार्थीनींच्या व्यक्तीमत्व विकासासाठी राबविण्यात येणा-या विविध उपक्रमांची व प्रशिक्षणाची माहिती मान्यवरांना दिली.

✦ **प्रथम सत्र** - वेळ सकाळी ११.३० ते १२.३०

विद्यार्थ्री व्यक्तीमत्व विकास शिबीराच्या प्रथम सत्राचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.कु.पुजा काला यांनी केले. विद्यार्थीनी व्यक्तीमत्व विकास शिबीराच्या प्रमुख प्रवक्त्या ॲड. रंजनाताई गवांदे यांनी आपल्या व्याख्यानात **'मी निर्भया '** या विषयावर मार्गदर्शन केले. आजची विद्यार्थीनी ही असुरक्षित असून या मागे स्त्रीयांना दिला जाणारा समाज व्यवस्थेतील दुय्यम दर्जा व पुरुषांची मानसिकता जबाबदार असल्याचे सांगितले याची पायाभरणी ही कुटुंबातच पालक आपल्या मुलगा मुलगी यांच्या जन्मा पासून ते पालन पोषन व संगोपन करताना होणा-या भेदभावात होतो असे सांगितले. विद्यार्थीनींना स्त्री-पुरुष समानतेचे महत्व पटवून देऊन समाजात वावरत असताना निर्भय,सक्षम व सजग होण्यासाठी कृतीशील उपाय योजना करण्याचे आवाहन केले.त्याकरिता शाररिक,मानसिक व बौध्दिक स्वास्थ्याचे संगोपन, योग्य आहार,व्यायाम व वाचन करण्याचा सल्ला दिला. आपल्या मनोगतामध्ये त्यांनी ऐव्हरेस्ट वीर अरुनिमा सिन्हा,गार्गी,मंगला यांच्या जीवनातील खडतर प्रयत्न व त्यानंतर मिळविलेले यश सांगून विद्यार्थीनींना प्रेरित केले.आपल्या भाषणाच्या समारोपात आदरणीय कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई पाटील यांनी लावलेल्या रयत वटवृक्षाची फांदी असलेल्या सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,या महाविद्यायात आमंत्रीत केल्याचे समाधान व्यक्त केले.तसेच मी निर्भया होणारच असा आत्मविश्वास प्रत्येक विद्यार्थीनींने बाळगण्याचे आवाहन केले. या सत्राचे आभार प्रदर्शन - प्रा.कु.श्वेता दुग्गल यांनी केले.

✦ **व्दितीय सत्र** - १२.३० ते १.३०.

विद्यार्थीनी व्यक्तीमत्व विकास शिबीराच्या व्दितीय सत्रातील कार्यक्रमाचे प्रास्ताविक तसेच प्रमुख वक्त्या यांचा परिचय व स्वागत प्रा.सौ.मंगल जगताप यांनी केले.व्दितीय सत्राच्या प्रमुख प्रवक्त्या प्रा.सौ.स्वप्नाली खांडरे यांनी **''पणतीच विझली तर दिवा कसा पेटणार?''** या विषयावर आपले विचार मांडले. समाजसुधारकांच्या आपल्या देशात स्त्रियांचे प्रश्न गंभीर बनत चालले आहेत. स्त्री ही कोणत्याही बाबतीत कमी नसून वेगवेळ्या क्षेत्रात तिने आपल्या उत्कृष्ठ कामगिरीची चुणूक जगाला दाखवून दिली आहे. मात्र तरी सुध्दा भारतात स्त्री पुरुष समानतेचा तोल ढासळत आहे. पुरुष प्रधान संस्कृती, वंशाला दिवा पाहिजे या कारणासाठी गर्भातच मुलींची हत्या केली जाते. त्यांना जन्मालाच येऊ दिले जात नाही. स्त्री भ्रूणहत्या व स्त्रीयांवर वांरवांर होणारे आत्याचार सध्याच्या गंभीर व संवेदनशील समस्या असून या सर्वांचे मुळ हे नेहमीच स्त्रींयाना दुय्यम लेखणा-या मानसिकतेत आहे.सुदृढ व निकोप समाजाच्या जडणघडणीसाठी स्त्री पुरुष समतोल आवश्यक आहे.मात्र आत्याधुनिक तंत्रज्ञानाचा गैर वापर करुन तो ढासळला जात असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यासाठी सरकारने अनेक कठोर कायदे व उपाय योजना केल्याचे स्पष्ट करुन,स्त्री भ्रूणहत्या विरोधी चळवळीत अनेक सेवाभावी संस्था व संघटना सक्रीय होवून काम करीत असल्याचे त्यांनी माहिती दिली.

समारोपात त्यांनी स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी सन्मानाने व माणूस म्हणून पाहणे हा दृष्टीकोन घराघरात रुजविणे आवश्यक आहे.व स्त्री जन्माचे स्वागत करावे असा संदेश दिला.

✦ **भोजन वेळ** - १.३० ते २.३०.

विद्यार्थीनी व्यक्तीमत्व विकास शिबीरासाठी उपस्थित असेलेल्या विद्यार्थीनींना स्नेह भोजन देण्यात आले.

✦ **तृतीय सत्र** - २.३० ते ३.३०.

तृतीय सत्राच्या प्रमुख वक्त्या प्रा.सौ.संध्या साळवे यांचा परिचय व स्वागत प्रा.दुग्गल श्वेता यांनी करुन दिला. प्रमुख प्रवक्त्या प्रा.सौ.संध्या साळवे यांनी **''निर्भया प्रकरणा संदर्भात सरकारने उचललेली पाऊले''** या विषयावर आपले विचार मांडताना दिल्ली येथे घडलेल्या २३ वर्षीय विद्यार्थीनीवर काही नराधमांनी केलेल्या सामूहिक बलात्कार व पाशवी आत्याचार या घटनेनंतरही त्या विद्यार्थीनीने मृत्युशी झुंज देत असतानाही निर्भयीपणे त्या नराधमांना शिक्षा ही झालीच पाहिजे असे निर्भयीपणे मांडलेल्या मंतांची पाठराखण केली. या निर्भयी विचारांना संपूर्ण दिल्लीकरांनीच नाही तर सर्व भारतभरातील युवक युवतींनी निषेध मोर्चे मुक मोर्चे काढून पाठिंबा दिला व या घटनेच्या गांभिर्याची न्याय व्यवस्थेला जाणिव करुन दिली. याची परिणीती म्हणजेच गुन्हेगार कायद्यात बदल करण्यात येऊन (Criminal Law Ammendment) Ordinance २०१३ या कायद्याची पुनर्रचना करण्यात आल्याची त्यांनी माहिती दिली. बलात्काराच्या कायदेशीर व्याख्येत व व्याप्तीत करण्यात आलेले बदल, Criminal procedure code and evidence act यामध्ये करण्यात आलेले बदल,प्रत्येक राज्यात एक या प्रमाणे महिला व बाल गुन्हंया करीता जलदगती न्यायालय,निर्भया कायदा २०१३ इ.बदलांवर विस्तृत विवेचन केले.राज्यसरकार व केंद्र सरकार यांच्या संयुक्तीक प्रयत्नाने निर्भया निधी,निर्भया बस,बालकांच्या लैगिंक शोषण विरोधी कायदा,महिला व बाल गुन्हेगारी व न्याय या करीता एकुण सत्र न्यायालयात करण्यात आलेली वाढ अशा घटनात्मक व योजनात्मक बदलांची माहिती देउन विद्यार्थीनींनी कुठल्याही सामाजिक अथवा कौटुंबिक दबावाला बळी न पडता निर्भयी पणे होण-या अत्याचारां विरोधात कायद्याचे व त्यातील तरतुदीचे सहाय्य घेण्याचे अवाहन केले.


✦ **समारोप** - ३.३० ते ४.३०.

विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास शिबीराच्या समारोप कार्यक्रमात विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये कु.फिरदोस शेख, कु.वैशाली अभंग यांनी आपल्या मनोगतात शिबीरामध्ये आपला स्वत:चा विकास करण्यासाठी समाजाचे व स्त्रियांचे आत्म मनोबल उंचवण्यासाठी असे शिबीर घेणे आवश्यक आहे. या शिबीरातनू आमच्या जीवनाचे शिल्पकार आम्हीच आहोत हे शिकायला मिळाले.समारोप समारंभाचे अध्यक्ष माननीय प्राचार्य.डॉ.एल.डी.भोर यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.प्रास्ताविक व स्वागत प्रा.सौ.गुजर पी.एस.यांनी केले.आभर प्रदर्शन प्रा.कु.प्रिया ताराळकर यांनी केले.

| | | |
|---|---|---|
| विद्यार्थिनी मंच<br>कार्यक्रम अधिकारी | विद्यार्थी कल्याण मंडळ<br>कार्यक्रम अधिकारी | प्राचार्य<br>सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स<br>श्रीरामपूर |


Dakale Jain College of Commerce Shrirampur

PRINCIPAL
C. D. Jain College of Commerce
Shrirampur




विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास शिबीराच्या प्रमुख वक्त्या मा. सौ. खाँडरे एस्. आर यांनी 'पणती विझली तर उद्या दिवा कसा लागेल' या विषयावर विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले.

Principal
C.D. Jain College of Commerce
Shrirampur Dist. Ahmednagar




विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास शिबीराच्या प्रमुख वक्त्या मा. सौ. साळवे एस्. के. यांनी 'निर्भया प्रकरणासंदर्भात सरकारने उचलेली पावले' या विषयावर व्याख्यान दिले




विदयार्थीनी व्यक्तीमत्व शिबीराच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षा मा. सौ. मीनाताई जगधने विद्यार्थिनींना मार्गदर्शन करतांना

Principal
C.D. Jain College of Commerce
Shrirampur, Dist. Ahmednagar




विदयार्थीनी व्यक्तीमत्व विकास शिबीराच्या प्रमुख वक्त्या मा. सौ. ॲड. रंजनाताई गवांदे यांनी "मी निर्भया" या विषयावर विद्यार्थी व विदयार्थीनींना मार्गदर्शन केले.

स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद

रयत शिक्षण संस्थेचे,

# चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर,
# जि. अहमदनगर - ४१३७०९

नॅक मानांकित "ए" ग्रेड

## विद्यार्थी कल्याण मंडळ, विद्यार्थिनी मंच व निर्भया कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## "आरोग्य प्रबोधन व्याख्यान "

## अहवाल

विद्यार्थी कल्याण मंडळ, विद्यार्थिनी मंच व निर्भया कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार ,दि. २० डिसेंबर २०१६ रोजी. "आरोग्य प्रबोधन व्याख्यान" आयोजित करण्यात आले. या कार्यकमासाठी महाविदयालयातील १५० विदयार्थिनींनी सहभाग घेतला. या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याता मा.डॉ.सौ. ठुबे प्रतिभा श्रीरामपूर,कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.प्राचार्य डॉ. एल. डी. भोर (सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,श्रीरामपूर),प्रमुख उपस्थिती मा.डॉ. जी.एच. बारहाते (उपप्राचार्य, संशोधन विभाग प्रमुख ), प्रा.डॉ.तुपे बी.जी.(विद्यार्थी कल्याण मंडळ, कार्यक्रम अधिकारी),प्रा डॉ. सौ. गुजर पी.एस. विदयार्थिनी मंच समन्वयक,प्रा सौ. जगताप एम.बी. व महाविदयालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका यांनी सावित्रीबाई फुले व सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमाची सुरुवात केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा सौ जगताप एम.बी.यांनी केले. प्रास्तविका मध्ये त्यांनी महाविद्यालयात येणारी विद्यार्थिनी हि शिक्षित तर होईलच परंतु त्याच बरोबर ती सक्षम, स्वसंरक्षक कशी होऊ शकेल? यासाठी हा 'निर्भया कक्ष' कार्यरत राहील. या 'निर्भया कक्षा' अंतर्गत विद्यार्थिनींच्या आत्मबळ विकासासाठी विविध विषयांचे मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहेत. त्याच बरोबर स्वसंरक्षणासाठी काही प्रशिक्षण वर्ग देखील या 'निर्भया कक्षा' अंतर्गत आयोजित करण्यात येऊन त्याचा लाभ महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी घेतला पाहिजे. असे स्पष्ट केले.

आरोग्य प्रबोधन प्रबोधन कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याता मा.डॉ.सौ. ठुबे प्रतिभा श्रीरामपूर, अहमदनगर, यांनी विद्यार्थिनींना **"बदलती जीवनशैली व आरोग्य"** या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये महिला या घर आणि बाहेर दोन्ही ठिकाणी काम करतात. त्यांना थकव्याची तक्रार करतांना बहुतांशी वेळा बघितले जाते. थकव्यामुळे कोमल आणि सुंदर चेहराही थकलेला आणि आशाहीन होतो. थकव्याच्या शिकार झालेल्या बहुतांशी महिलांना थकवा दूर करण्यासाठी वेदनाशामक औषधांचा वापर करावा लागतो. त्यामुळे त्यांना आराम मिळतो. परंतु त्यांच्या

आरोग्यावर चुकीचा प्रभाव पडतो. तुम्ही जसे शरीराला जपता तसे मनाला देखील जपणे आणि त्याची काळजी घेणे आवश्यक आहे. दैनंदिन जीवनात स्त्रियांच्या आयुष्यात विविध जबाबदाऱ्या असतात. ती विविध स्तरातील कामे सहजपणे करत असते. त्यामुळे तिला "अष्टभूजा" देखील म्हटले जाते. हे करत असताना प्रत्येक स्त्रीने देखील स्वत:च्या आरोग्याची आणि मनाची काळजी स्वत: घेणे आवश्यक आहे. कारण ती जर शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या तंदुरुस्त असेल तरच ती तिच्या कुटुंबातील सदस्यांचे आरोग्य चांगले ठेवू शकते. यासाठी प्रत्येक सदस्याने आपली पत्नी, आई, सुन, मुलगी यांची काळजी घेतली पाहिजे. यासाठी विद्यार्थिनींमध्ये योग्य शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्ती, स्वास्थ्य असेल तर हे सर्व मिळविता येणे शक्य आहे असे स्पष्ट केले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा प्राचार्य डॉ एल डी.भोर यांनी चांगले आरोग्य हा मानवाचा अधिकार आहे व यासाठी काही चांगल्या सवयी अंगीकारणे फार महत्वाचे आहे. या दृष्टीने संतुलित आहार व रोज व्यायाम करणे हा उत्तम उपाय आहे. आजकालच्या धकाधकीच्या जीवनात आपल्या आहारावर जर आपण नियंत्रण ठेवू शकलो तर भविष्यातील बऱ्याचशा व्याधी आपण टाळू शकतो.व्यायामामुळे आपल्या शरिराची लवचिकता व ताकद योग्य ठेवली जाते व जरी आपले काम बैठे असले तरी त्याचे दुष्परिणाम होणार नाहीत. म्हणूनच असे म्हटले जाते **Health is wealth** आरोग्य हीच संपत्ती. उत्तम व परिपुर्ण आरोग्याशिवाय समृद्ध आयुष्याची व्याख्या पुर्ण होऊ शकत नाही म्हणून आरोग्याची काळजी कशी घ्यावी या विषयी महाविद्यालयात निर्भयाकक्षा अंतर्गत मार्गदर्शन केले जाते याचा लाभ महाविदयलयातील विद्यार्थिनींनी घ्यावा असे सांगितले.

या कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांचे आभार प्रदर्शन प्रा.साळवे एस के.यांनी केले

विद्यार्थिनी मंच
कार्यक्रम अधिकारी

विद्यार्थी कल्याण मंडळ
कार्यक्रम अधिकारी

प्राचार्य
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स
श्रीरामपूर

Chandraroop Dakale Jain College of Commerce
Shrirampur

PRINCIPAL
C. D. Jain College of Commerce
Shrirampur

**Rayat Shikshan Sanstha's**

# Chandraroop Dakle Jain College of Commerce,

**Shrirampur Dist. Ahmednagar- 413709**

**In Collaboration with 'Students Development Board'**

**And**

**'Widyarthini Munch'**

**And Nirbhaya Cell' Organized**

**A Lecture On Women's Social And Cultural Awareness**

**Report On: "Health Guidance"**

On 20th Dec. 2016, at 10:30 am a lecture on 'Health Guidance' was organized by C.D.Jain College of Commerce, Shrirampur. Prof.Sau. Kandare S.R. welcomed and made few preliminary remarks. The introduction of the chief guest of honour, Dr.Thube Pratibha and the chair-person Hon'ble Dr.Prof.L.D.Bhor sir, the principal of C.D.Jain College of Commerce, shrirampur is done with enthusiasm as well.

Dr.Thube Pratibha expressed her views on the importance of Health and Diet and addressed the students with great fervours about the maintenance of the Health and the care should be taker to retain it without any damage.

Dr.L.D.Bhor sir also guided the students with great interests as well. Dr.G.H.Barhate, the HOD of Research Centre, has graced the programme as well. Prof.Sau.Gujar P.S. has done the anchoring exceedingly well. Prof.Sau.Jagtap M.B. proposed a 'Vote of thanks in the end.

| Coordinator<br>Students' Development Board | Chairman<br>Widyarthini Munch | Principal<br>C. D. Jain College of Commerce, Shrirampur |
|---|---|---|



स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद - " कर्मवीर "

रयत शिक्षण संस्थेचे,



# चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर,

## जि. अहमदनगर - ४१३७०९


नॅक मानांकित "ए" ग्रेड

## विद्यार्थी कल्याण मंडळ व विद्यार्थिनी मंच
## यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
# "निर्भय कन्या अभियान शिबीर"

### कार्यक्रम पत्रिका


**सोमवार, दि. २० फेब्रुवारी २०१७** — **वेळ :- स. ९.३०**

- ▲ **प्रास्ताविक व स्वागत** : मा.प्राचार्य डॉ. एल. डी. भोर
  (सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर)
- ▲ **पुस्तक प्रकाशन** : ' मी निर्भया '
- ▲ **प्रमुख पाहुणे** : मा.सौ.राणीताई बाळासाहेब पाटील
  (माजी सरपंच, भुयेवाडी, कोल्हापूर,
  यशदा, पुणे)
- ▲ **अध्यक्षा** : मा. सौ. मीनाताई जगधने
  (मॅनेजिंग कौन्सिल सदस्या, रयत शिक्षण संस्था, सातारा.
  चेअरमन रयत शैक्षणिक संकूल, श्रीरामपूर )
- ▲ **प्रमुख उपस्थिती** : मा.डॉ. जी.एच. बारहाते
  (उपप्राचार्य, संशोधन विभाग प्रमुख )
- ▲ **आभार प्रदर्शन** : प्रा.सौ.साळवे एस.के.
- ▲ **सूत्र संचालन** : प्रा.डॉ.सौ.गुजर पी.एस.
  (विद्यार्थिनी मंच समन्वयक)




C. D. Jain College of Commerce
Shrirampur.

निर्भय कन्या अभियान शिबीरामध्ये कार्यक्रमाच्या प्रमुख वक्ते मा. सौ. राणीताई बाळासाहेब पाटील विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना



C. D. Jain College of Commerce
Shrirampur.

निर्भय कन्या अभियान शिबीरामध्ये कार्यक्रमाचा आनंद घेताना महाविद्यालयातील विद्यार्थिनी

तनपुरे यांनी प्रवासी संघटनेच्या मागण्या 'भुयारी मार्ग' करावा. पंढरपूर, झेलम वेटिंग रूम सुविधा करावी. सुटणार आहे.

सकाळ दि. २६/२/२०१८ रविवार

# आई-वडिलांचे स्वप्न सत्यात उतरवा : जगधने

**श्रीरामपूर, ता. २५ :** आई-वडील आपल्या भवितव्यासाठी पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत शेतात राबत असतात. त्यांच्या स्वप्नांना तडा जाऊ न देण्याची आपली जबाबदारी आहे. आपले ध्येय महाविद्यालयीन जीवनातच निश्चित करा. कठोर परिश्रम करून आई-वडिलांचे स्वप्न सत्यात उतरवा, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मीनाताई जगधने यांनी केले.



श्रीरामपूर : डाकले महाविद्यालयातील निर्भय कन्या अभियान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना मीनाताई जगधने. व्यासपीठावर राणी पाटील, सुनयना चाळके व प्राचार्य डॉ. एल. डी. भोर.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व चंद्ररूप डाकले जैन वाणिज्य महाविद्यालय यांनी निर्भय कन्या अभियान शिबिर आयोजित केले आहे. त्याच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून जगधने बोलत होत्या. पुणे येथील 'यशदा'च्या राणी पाटील, मयूवाडीच्या (कोल्हापूर) माजी सरपंच सुनयना चाळके, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर या वेळी उपस्थित होते.

पाटील म्हणाल्या, ''मुलींनी शारीरिक-मानसिक-भावनिकदृष्ट्या सक्षम व्हावे. त्यासाठी आदर्श विचारांचे बीज मुलींमध्ये पेरले गेले पाहिजे. गुणवत्ता, कष्ट, पारदर्शकता जीवनात महत्त्वाची आहे. तेवढेच महत्त्व स्वाभिमान, संघर्ष आणि त्याग यालाही आहे. मुलींची संख्या वाढविण्यासाठी समाजाचे उद्बोधन करणे गरजेचे आहे. कारण मुलगी वाचली, तरच देश वाचेल.''

पाहुण्यांच्या हस्ते 'मी निर्भया' पुस्तकाचे प्रकाशन झाले. डॉ. भोर यांनी प्रास्ताविक व प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. के. साळवे यांनी आभार मानले. उपप्राचार्य डॉ. जी. एच. बारहाते, प्रा. डॉ. शिरीष गवळी, प्रा. डॉ. उज्ज्वला भोर, प्रा. डॉ. बी. जी. तुपे कार्यक्रमास उपस्थित होते.

स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद - " कर्मवीर "

रयत शिक्षण संस्थेचे,

# चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर, जि. अहमदनगर - ४१३७०९

नॅक मानांकित "ए" ग्रेड

## विद्यार्थी कल्याण मंडळ, विद्यार्थिनी मंच व निर्भया कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# "निर्भय कन्या अभियान शिबीर "

# अहवाल

दि. २०/२/२०१७

चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी कल्याण मंडळ व विद्यार्थिनी मंच यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये निर्भया कक्ष स्थापन करण्यात आला. त्यामध्ये निर्भय कक्ष समिती नेमून महाविदयालयातील सर्व महिला प्राध्यापिकाचा समावेश करण्यात आला. महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, अंतर्गत राबविण्यात आलेल्या निर्भया हा महत्वाकांक्षी उपक्रम आहे. महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यर्थिनींच्या दैनंदीन जीवनात येणाऱ्या समस्या, समाजामधील विकृतींना सामोरे जाऊन त्यातून मार्ग काढण्याची क्षमता कशी निर्माण करता येईल या सर्व बाबींचा विचार करुन विद्यार्थिनींसाठी निर्भया कक्ष स्थापन करण्यात आला. या कक्षा अंतर्गत महिलांशी निगडीत विविध समस्यांच्या विषयांवर मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली त्यामध्ये स्वसंरक्षण प्रसंगावधान, सावधगिरी, सामाजिक व सांस्कृतीक जाणिव, आणि कराटेचे प्रशिक्षण देण्यात आले. अशा विविध विषयांवर मार्गदर्शनपर व्याख्याने व विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण, कराटे, प्रसंगावधान व सावधगिरीचे प्रशिक्षण देण्यात आले.महाविद्यालयातील विद्यार्थिनींना आत्मनिर्भर व सक्षम बनवविण्यासाठी तसेच बाहेरील विकृत प्रवृत्तीला सामोरे जाण्यासाठी एक खंबीर व उज्वल भविष्याची शिदोरी देण्यासाठी कार्यरत राहण्याचा महाविद्यालयाचा या निर्भया कक्षाच्या उपक्रमामार्फत प्रयत्न करण्यात आला आहे.

निर्भय कक्ष स्थापनेचा उद्देश स्वसंरक्षणसह, विदयार्थिनींना बौध्दिक, शारिरिक, मानसिक, भावनिक इ.स्तरावर सक्षम बनविण्यासाठी चालू शैक्षणिक वर्षात किमान तीन उपक्रमाचे आयोजन करणे आवश्यक आहे. हा उददेश समोर ठेवून निर्भया कक्षा अंतर्गत २०१६-१७ या वर्षात वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले.

प्रथम ३ सप्टेबर २०१६ रोजी निर्भया कक्षाची स्थपना करण्यात आली. निर्भया कक्ष व विदयार्थिनी व्यक्तिमत्व विकास शिबीर उद्घाटन समारंभ व वार्षिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. विद्यार्थी कल्याण मंडळ व विद्यार्थिनी मंच यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनी व्यक्तीमत्व विकास शिबीर दि.०३ सप्टेबंर २०१६ रोजी आयोजित करण्यात आले.या शिबीरासाठी

महाविद्यालयातील २१५ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. या शिबीराच्या उद्घाटन सोहळ्यास उद्घाटक म्हणून ॲड.रंजनाताई गवांदे (सामाजिक कार्यकर्त्या,महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समिती ) लाभल्या.कार्यक्रमाचे अध्यक्षा मा.सौ.मीनाताई जगधने, चेअरमन, रयत शैक्षणिक संकुल,श्रीरामपूर,मॅनेजिंग कौन्सिल सदस्य,रयत शिक्षणसंस्था,सातारा यांनी भुषविले. महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.एल.डी.भोर व उपप्राचार्य मा.डॉ.जी.एच.बारहाते यांनी शिबीराचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती नोंदविली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा सौ.पोर्णिमा गुजर यांनी केले. प्रास्ताविकात विद्यार्थीनी व्यक्तीमत्व विकास शिबीराचे उददेश व पाहुण्यांचा अल्प परिचय करुन दिला. उद्घाटक म्हणून लाभलेल्या मा.ॲड.रंजनाताई गवांदे यांनी आपल्या मनोगतामध्ये स्त्रीयांवरील होणा-या अत्याचारामागे अशा कृत्यांची पुनरावृत्ती होण्यामागे असलेले मुलभूत कारण म्हणजे पुरुषांची स्त्रियांबदद्ल असलेली मानसिकता असून ते बदलण्याची गरज व्यक्त केली.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना सौ.मीनाताई जगधने यांनी महाविद्यालयातील विद्यार्थिनी निर्भया होण्यासाठी सर्व प्रथम मुलींनी स्वताची ओळख करुन घेऊन श्रध्दा व अंधश्रध्दा यामधील फरक ओळखून ते आचरणात आणणे कसे गरजेचे आहे ते पटवून दिले. आजच्या विद्यार्थिनीने कोणतीही व्रत वैकल्ये करतांना शास्त्रीय दृष्टीकोन अंगीकारावा व वृक्षारोपण हे आपले कर्तव्य आहे, असे समजून या व्रताचा स्विकार करण्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथीपदी असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.डी.भोर यांनी उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षा व उद्घाटक यांचे स्वागत व सत्कार केला. महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी या व्यक्तीमत्व विकासासाठी राबविण्यात येणा-या विविध उपक्रमांची व प्रशिक्षणाची माहिती मान्यवरांना दिली.

दि.०३ सप्टेबंर २०१६ रोजी मा.ॲड.रंजनाताई गवांदे निर्भया कक्ष अतंर्गत स्त्रियांचे कायदे या विषयी माहिती दिली. निर्भया विचाराने संपूर्ण दिल्लीकरांनीच नाही तर सर्व भारत भरातील युवक युवतींनी निषेध मोर्चे मुक मोर्चे काढून पाठिंबा दिला व या घटनेच्या गांभिर्याची न्याय व्यवस्थेला जाणिव करुन दिली.याची परिणीती म्हणजेच गुन्हेगार कायद्यात बदल करण्यात येऊन (Criminal Law Ammendment)Ordinance २०१३ या कायद्याची पुनर्रचना करण्यात आल्याची त्यांनी माहिती दिली. बलात्काराच्या कायदेशीर व्याख्येत व व्याप्तीत करण्यात आलेले बदल,Criminal procedure code and evidence actयामध्ये करण्यात आलेले बदल,प्रत्येक राज्यात एक या प्रमाणे महिला व बालगुन्हया करीता जलदगती न्यायालय, निर्भया कायदा २०१३ इ.बदलांवर विस्तृत विवेचन केले. राज्यसरकार व केंद्र सरकार यांच्या संयुक्तीक प्रयत्नाने निर्भया निधी,निर्भया बस, बालकांच्या लैगिंक शोषण विरोधी कायदा, महिला व बालगुन्हेगारा व न्याय या करीता एकुण सत्र न्यायालयात करण्यात आलेली वाढ अशा घटनात्मक व योजनात्मक बदलांची माहिती देऊन विद्यार्थीनींनी कुठल्याही सामाजिक अथवा कौटुंबिक दबावाला बळी न पडता निर्भयी पणे होण-या अत्याचारा विरोधात कायदयाचे व त्यातील तरतुदी चे सहाय्य घेण्याचे अवाहन केले.

दि. २१ सप्टेंबर २०१६ रोजी विद्यार्थी कल्याण मंडळ, विद्यार्थिनी मंच व निर्भया कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने "आरोग्य प्रबोधन व्याख्यान "आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविदयालयातील १५० विदयार्थिनींनी सहभाग घेतला. या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याता मा.डॉ.सौ.किरणदेवी दिपक रॉय अहमदनगर, कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.प्राचार्य डॉ. एल. डी. भोर (सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,श्रीरामपूर),प्रमुख उपस्थिती मा.डॉ. जी.एच. बारहाते (उपप्राचार्य, संशोधन विभाग प्रमुख ), प्रा.डॉ.तुपे बी.जी.(विद्यार्थी कल्याण मंडळ, कार्यक्रम अधिकारी),प्रा डॉ. सौ. गुजर पी.एस. विदयार्थिनी मंच समन्वयक,प्रा सौ. जगताप एम.बी. व महाविदयालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका यांनी सावित्रीबाई फुले व सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमाची सुरुवात केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा सौ जगताप एम.बी.यांनी केले. त्यांनी महाविदयालयात २०१६-१७ या वर्षात निर्भया कक्ष अंतर्गत विदयार्थिनीसाठी राबविण्यात येणा-या उपक्रगाबदद्ल माहिती दिली. तसेच विदयार्थिनाचे आरोग्य बाबतचे महत्त्व पटवून दिले.

आरोग्य प्रबोधन प्रबोधन कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याता मा.डॉ.सौ.किरणदेवी दिपक रॉय अहमदनगर,यांनी "आरोग्य चांगले तर जीवन सुंदर"या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये आजच्या स्पर्धेच्या युगात स्त्रीयांच्या आरोग्याच्या समास्या वाढताना दिसून येत आहे. या स्पर्धेच्या युगात ताणतणाव अपरिहार्य आहेत. त्यांमुळे त्यांना तोंड देण्याची क्षमता महाविद्यलयातील मुलींमध्ये निर्माण होणे अतिशय महत्वाचे आहे. म्हणून महाविद्यालयातील मुलींनी हे सर्व आत्मसात करण्यासाठी सर्वांत प्रथम आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे.असे स्पष्ट केले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा प्राचार्य डॉ एल डी.भोर यांनी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत राबविण्यात आलेल्या निर्भया कक्ष स्थापनेचा हा महत्वाकांक्षी उपक्रम आहे असे सांगितले.

दि. २८ नोव्हेंबर २०१६ रोजी निर्भया कक्ष अंतर्गत विदयार्थिनीमध्ये शौर्य निर्माण करणे या विषया अंतर्गत "आरक्षण नको संरक्षण हवे" या विषयावर मा. कु ज्योती चौधरी यांनी विदयार्थिंना मार्गदर्शन केले. आज एकूण सर्व समाजपध्दतीचा अभ्यास करता ही गोष्ट लक्षात येते की, अत्याचारानंतर काही पवित्रा घेण्याऐवजी हा अत्याचार होऊच नये यासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे. स्त्रियांनी यासाठी पुढे येणे गरजेचे आहे. अत्याचार करणाऱ्यांच्या नावाने बोटे मोडणेपेक्षा स्वसंरक्षणासाठी प्रयत्न करावे. आज प्रत्येक ठिकाणी स्त्रियांच्या संरक्षणासाठी सर्व सुविधा करण्यात येत आहेत. परंतु त्यापेक्षा स्त्रीने स्वत: सक्षम होणे गरजेचे आहे. त्यासाठी अनेक प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. उदा. कराटे किंवा बॉक्सिंग इ. अनेक प्रकारचे प्रशिक्षण स्त्रीया व मुलींसाठी उपलब्ध करण्यात आले आहेत. फक्त आता त्यांनी त्याचा लाभ घेणे व स्वत:च्या स्वाभिमानासाठी झगडणे जास्त गरजेचे आहे.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा प्राचार्य डॉ एल डी.भोर यांनी विद्यार्थिनींना गरज आहे स्वसंरक्षणाची सावधगिरीची व प्रसंगावधानाची यासाठी महाविद्यालयात अनेक उपक्रम राबवले जातात. त्यातलाच एक भाग म्हणून कराटे प्रशिक्षणाचे वर्ग सुरु करण्यात आले. यामध्ये एकूण ४५

विद्यार्थिनींनी भाग घेतला.या प्रशिक्षणाला हजर राहिल्याबद्दल त्यांचे खरोखर अभिनंदन. जर तरुणी अशाच जागरुक राहिल्या तर कोणी त्यांच्याकडे वाकडया नजरेने बघणार नाहीत. आणि खऱ्या अर्थाने सर्वच विद्यार्थिनी "निर्भया" बनतील असे स्पष्ट केले.

दि. ३ जानेवारी २०१७ रोजी निर्भया कक्ष अंतर्गत विदयार्थिनीमध्ये सामाजिक व सांस्कृतीक जाणिव या विषया अंतर्गत "भय इथले संपत नाही" या विषयावर प्रा.निफाडे बी.व्ही.यांनी मार्गदर्शन केले. माणसातल्या श्वापदाचा माणुस बनवण्यासाठी समाज प्रबोधनाची आवश्यकता आहे. सातत्याने याविषयी बोलले, लिहीले गेले पाहिजे. एखादी घटना घडल्यानंतर काही दिवस तिचा उहापोह केला जातो मात्र त्यानंतर यापेक्षा काही मोठी घटना घडली की, पुर्वीची घटना विसरुन आपण पुढे जातो. म्हणूनच नुसते कायदे करून न थांबता त्या कायद्यांची कठोर अमंलबजावणी झाल्याशिवाय ही श्वापदे वठणीवर येणार नाहीत. आजच्या काळात या नराधमांना कठोर उपाययोजनांनीच जरब बसेल. सरकार काही करेल, समाज काही करेल, सरकारकडे याचना करण्यापेक्षा प्रत्येकाने माणुस म्हणून धीटपणाने पुढे येऊन समाजात जागरुकता निर्माण केली पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने समाजात परिवर्तन होऊ शकते. प्रत्येक घरातुन, कुटुंबातुन मुलांवर स्त्री सन्मानाचे संस्कार , विचार रूजविले तर अशा घटनांना नक्कीच पायबंद घालता येईल. याही पुढे जाऊन प्रत्येक महिलेनं-स्त्रीने आपल्या मदतीला कोणी धावून येईल, सरकार, कायदा माझे रक्षण करील यापेक्षा मी स्वत:चे रक्षण स्वत: करीन इतके सक्षम बनण्याची गरज आहे.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा प्राचार्य डॉ एल डी.भोर यांनी प्रत्येक महिलेनं-स्त्रीने आपल्या मदतीला कोणी धावून येईल, सरकार, कायदा माझे रक्षण करील यापेक्षा मी स्वत:चे रक्षण स्वत: करीन इतके सक्षम बनण्याची गरज आहे. आज संरक्षणापेक्षा गरज स्वसंरक्षणाची आहे. म्हणूनच महाविद्यालय पातळीवर स्वसंरक्षण, सामाजिक-सांस्कृतिक जाणीव, स्त्रीयांच्या-मुलींच्या प्रश्नांची सोडवणूक होण्यासाठी विविध कृती-कार्यक्रम आखले जात आहेत व समाज प्रबोधन पर व्याख्याने आयोजित केली जात आहेत. याचा नक्कीच महाविद्यालयीन युवतींना फायदा होईल असे स्पष्ट केले.

